# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५
**दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४ / २२१६ ३९६५, **ई-मेल:** mercindia@merc.gov.in
**संकेत स्थळ:** www.merc.gov.in


**विज्ञापन संख्या: ०२/२०२५**

## जाहीर सूचना

**प्रकरण क्र. ०१/एसएम/२०२५** **२० फेब्रुवारी, २०२५**

### आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता नूतनशील ऊर्जेच्या दराबाबत आयोगाने स्वत:हून तयार केलेल्या प्रारुप आदेशावर सुनावणी

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (नूतनशील ऊर्जेच्या दर निश्चितीकरणाच्या अटी व शर्ती) विनियम, २०१९ मधील विनियम ८ ला अनुसरुन, महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानांकरिता आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगाने स्वत: पुढाकार घेऊन प्रारुप आदेश तयार केला असून तो आयोगाच्या **www.merc.gov.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

२. आयोग याद्वारे सदर प्रारुप आदेशावर जनतेकडून हरकती व सूचना मागवित आहे. इच्छुक व्यक्ती / संबंधितांना आयोगाच्या संकेत-स्थळावरील '**E-public consultation**' या टॅबद्वारे त्यांच्या सूचना/हरकती इंग्रजी किंवा मराठी भाषेमध्ये लेखी अपलोड करता येतील **(www.merc.gov.in/e-public-consultation)** या टॅबचा वापर करण्यात कोणतीही अडचण आल्यास, संबंधित व्यक्ती कामकाजाच्या सर्व दिवसांमध्ये सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या दरम्यान मोबाईल क्र. ८९२८०७१५२२२ वर किंवा **suggestions@merc.gov.in** या ई-मेल आयडीवर संपर्क साधू शकतात.

ज्या व्यक्ती/हितसंबंधितांनी आयोगाच्या '**E-Public Consultation**' या टॅबवर सूचना आणि हरकती दाखल केल्या असतील त्यांस त्यांच्या निवेदनाची छापील प्रत दाखल करण्याची आवश्यकता नाही. ज्या व्यक्तीला इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करणे शक्य नाही त्यांनी त्यांच्या सूचना आणि हरकतींची छापील प्रत सचिव, **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५** या पत्त्यावर पाठवावी.

कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने हरकती पाठविण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. **दिनांक १३ मार्च, २०२५** रोजी सायंकाळी ६.०० नंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत. अन्य कोणत्याही माध्यमाद्वारे दाखल करण्यात आलेल्या सूचना/हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

३. वरील परिच्छेद (२) नुसार, अभिप्राय / हरकती पाठविणाऱ्या आक्षेपकाला त्याचे म्हणणे ई-जन सुनावणीमध्ये व्यक्तिश: मांडावयाचे असल्यास सूचना / हरकती दाखल करताना त्याने तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक / आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. जाहीर ई-जन सुनावणीत भाग घेणाऱ्या सर्व व्यक्ती आयोगाने दि. १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी जारी केलेल्या आयोगाच्या याचिकेच्या ई-सुनावणीसाठी अनुसरावयाची परिचालनात्मक कार्यपध्दती आणि प्रोटोकॉल वरील कार्यप्रणाली निर्देशांचे पालन करतील.

४. **दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता** व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे ई - सुनावणी घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**सही/-**

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
**सचिव, मविनिआ**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: २० फेब्रुवारी, २०२५**